# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–४३ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २२ मे २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669




# विकासकामा अंतर्गत सुरू असलेल्या रस्त्यांची कामे ६० ते ७० टक्के पूर्ण

## पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण होतील या दृष्टीने रात्रंदिवस काम करण्याचे कार्यकारी अभियंत्यांना निर्देश

**दिवा प्रभाग समितीत सर्वाधिक ६४ रस्त्यांची कामे सुरू**

**ठाणे:** ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात प्रभागसमितीनिहाय विविध ठिकाणी यूटीडब्ल्यूटी, सिमेंट काँक्रिटीकरण, मास्टिक पध्दतीने रस्त्यांची कामे सुरू आहेत. नागरिकांना चांगल्या प्रकारचे व खड्डेमुक्त रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी सद्यस्थितीत: सुरू असलेली कामे ६० ते ७० टक्के पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील या दृष्टीने युध्दपातळीवर काम करण्याचे निर्देश देत असतानाच रस्त्याची कामे गुणवत्तापूर्वकच झाली पाहिजेत अशा सूचना त्यांनी कार्यकारी अभियंत्यांना दिल्या आहेत.

## निकृष्ट कामे खपवून घेतली जाणार नाहीत – ठामपा आयुक्त अभिजीत बांगर

ठाणे महापालिका हद्दीत सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त बांगर यांनी नुकतीच बैठक आयोजित केली होती. या बैठकीत कार्यकारी अभियंतानिहाय कामनिहाय आढावा घेण्यात आला. सध्या सुरू असलेल्या कामांची स्थिती, त्याची अपेक्षित काम पूर्ण होण्याची तारीख, काम पूर्णत्वाबाबत काही अडचणी असतील तर त्या कशा सोडविता येतील या बाबींची चर्चा करण्यात आला. यापूर्वी पूर्ण झालेल्या कामांची बिले सादर झाली आहेत का? गुणवत्तापूर्वक कामे केली असतील तर देयके प्रलंबित राहणार नाही याबाबत दक्ष रहा अशा सूचना आयुक्तांनी केल्या. रस्त्यांची कामे ही दर्जेदार पध्दतीने होतील यासाठी सर्व कार्यकारी अभियंत्यांनी या कामावर नजर ठेवा. शहरातील जे मुख्य रस्त्यांना प्रथम प्राधान्य देवून ही कामे तातडीने पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करावे,

(पान ३ वर)

# कोकणवासीयांसाठी मनसेचे आमदार राजू पाटील यांचे रेल्वे राज्यमंत्र्यांना खरमरीत पत्र

## रेल्वे आरक्षणाचा आढावा घेण्याची मागणी

**दिवा:–** कोकणात गणपती निमित्त जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे आरक्षण आत्ताच फुल झाल्याने गणेश भक्तांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन रेल्वे राज्यमंत्र्यांनी या रेल्वे आरक्षण प्रकरणाचा आढावा घ्यावा व कोकणवासीयांना रेल्वे आरक्षण उपलब्ध करून द्यावे अशी मागणी मनसेचे आमदार राजू पाटील यांनी केली आहे.

मुंबई, ठाणे परिसरातून गौरी गणपती निमित्त कोकणात मोठ्या प्रमाणावर भाविक आपल्या मूळ गावी जात असतात. यावर्षी गौरी गणपती निमित्त गावी जाणाऱ्या गाड्यांचे आरक्षण सुरू झाले, पण तिकीट आरक्षित करून सुरक्षित प्रवासाचे स्वप्न पाहणाऱ्या कोकणी माणसाचा भ्रमनिरास झाला आहे.

आरक्षण सुरू झाल्यानंतर पहिल्याच मिनिटाला सर्वच गाड्यांचे बुकिंग फुल्ल झाल्याचे मेसेज दिसायला लागले, इतकचं नव्हे तर वेटिंग तिकिट सुद्धा मिळत नाहीये अशी परिस्थिती दिसून येतेय. वास्तविक दरवर्षी अशीच परिस्थिती उद्भवत असताना, रेल्वे मंत्रालयातून यावर कोणताही तोडगा काढला जात नाही. दलालांच्या हातात आज सर्व आरक्षण असून परराज्यातून सर्रासपणे तिकिटे बुक होतात आणि हिच तिकिटे नंतर दलालांच्या मार्फत चढ्या भावाने कोकणी माणसाला विकली जातात. इतकी भयानक परिस्थिती असताना रेल्वे मंत्रालयाकडून साधी चौकशीही होत नसल्याने दलालांचे चांगलेच फावत असल्याचे आमदार राजू पाटील यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

तरी रेल्वे राज्य मंत्र्यांनी यात तातडीने लक्ष घालून सर्व गाड्यांच्या आरक्षणाचा आढावा घ्यावा तसेच नवीन गाड्यांचे नियोजन आत्ताच करून गौरीगणपती निमित्त जाणाऱ्या सर्व भाविकांना आरक्षित तिकिट मिळून प्रवास सुखकर होईल याची काळजी घ्यावी अशी मागणी त्यांनी आपल्या पत्रात केली आहे.




दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, २२ मे २०२३



# रेल्वे प्रशासनाच्या तत्परने हरवलेल्या वस्तूही देण्यात यश

**ठाणे:** रेल्वे प्रवासात जर का घाईगडबडीत चुकून राहिलेली किंवा हरवलेली वस्तू तसेच मौल्यवान ऐवज परत मिळेलचा याचा कोणताच नेम नसतो. मात्र तरी सुद्धा ती वस्तू मिळावी या उद्देशाने ठाणे रेल्वे स्टेशन प्रबंधक कार्यालयाकडे धाव घेतली आणि योगायोगाने काही जणांना त्यांच्या वस्तू परतही मिळाल्या आहेत. अशाप्रकारे गेल्या अडीच महिन्यात प्रबंधक कार्यालयात धाव घेणाऱ्या तब्बल ५० रेल्वे प्रवासी यांना त्यांच्या मौल्यवान वस्तू परत देत देण्यात रेल्वे प्रशासनाला यश आले आहे. यामध्ये मोबाईल फोन, महत्वाची कागदपत्रे, कपड्यांच्या बॅग, दागिनेच तर रोख रक्कमेचा समावेश आहे. यावरून अजून प्रामाणिकपणा असल्याचे प्रखरतेने दिसत आहे.

ऐतिहासिक असलेल्या ठाणे रेल्वे स्थानकात दिवसेंदिवस प्रवासी संख्या वाढत आल्याने वर्दळीसह ताणही येत आहे. सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळेत लोकलमध्ये चढणे किंवा उतरणे ही तारेवरची कसरत असते. मात्र या कसरतीत काहीवेळा जवळची वस्तू रेल्वेत विसरण्याचा घटना घडतात. स्थानकात लांब पल्ल्याच्या मेल एक्सप्रेस देखील थांबत असल्याने या गाड्यांमध्ये वस्तू राहण्याचे प्रकार होतात. रेल्वेत राहिलेली वस्तू परत मिळेल का ? अशा संभ्रमात असताना, प्रवासी ठाणे रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात तक्रार करतात. परंतु रेल्वे कर्मचारी आणि अधिकारी यांच्या कर्तव्यदक्षते मुळे अनेक हरवलेल्या वस्तू परत मिळाल्या आहेत. मार्च ते १५ मे या अडीज महिन्यात सुमारे ५० प्रवाश्यांना त्यांचा किमती ऐवज परत केला आहे. दरम्यान, रेल्वेतच नव्हे तर, तर मत्स्यगंधा एक्सप्रेस मध्ये राहिलेल्या बॅगेत लाखो रुपयांचे दागिने होते. ही किमती बॅग देखील प्रवाशाला मिळवून देत, त्यांची अशीही मदत करीत वस्तू मूळ मालकाला परत केली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.दरम्यान, नुकतेच प्लॅटफॉर्म क्रमांक १० वर वाशी ट्रेन मध्ये एक व्यक्ती सुमारे ७५ हजाराची रोकड असलेली पिशवी विसरून गेला होता. रेल्वे सफाई कर्मचारी यांनी ही बॅग ठाणे रेल्वे व्यवस्थापक केशव तावडे यांच्याकडे आणून दिली. पिशवीत पैसे आणि कागदपत्र होती. पिशवीत कोणताच सुगावा नसताना, पिशवी शोधत स्टेशन मास्टर कार्यालयात आलेल्या प्रवाशाला त्याची पिशवी सुपूर्द केली.

# मैत्रिणीला वाचविणे दुसऱ्या मैत्रिणीच्या जीवावर बेतले

## हल्लेखोर अवघ्या २ तासात जेरबंद

**ठाणे:** खून आणि खुनाचा प्रयत्न करणाऱ्या नागेश बाळू रुपवते याला अवघ्या दोन तासांच्या आत अटक करत तो गुन्हा उघडकीस आणण्यात मुंब्रा पोलिसांना यश आले आहे. या घटनेत नागेश याने त्याची पत्नी किरण खंदारे आणि तिची मैत्रीण ज्योती सोनकर अशा दोघींवर चाकुने हल्ला केला. यामध्ये ज्योतीचा मृत्यू झाला असून किरण ह्या जखमी असून त्यांना कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. तर मारेकऱ्याला येत्या २२ मे रोजी पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा बिट हद्दीतील पोलीस नाईक रविंद्र देसले व चालक पोलीस शिपाई पाटोळे असे पी.सी.आर-१ मोबाईलने १५ मे २०२३ रोजी रात्री ३ वाजण्याच्या सुमारास आगासन ते दिवा परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी, त्यांना एक मुलगी जखमी अवस्थेत रस्त्याचे कडेला उभी असल्याचे निर्दशनास आली.. तिच्या जवळ जाऊन विचारणा केली असता तिने तिचे नावे किरण विठ्ठल खंदारे असे सांगुन ती तिची मैत्रीण ज्योती सोनकर हिचे सोबत पाटील टॉवर दिवा पूर्व येथे आगासल रोडवरील,पाटील टॉवरच्या रूम नं. ५११ मध्ये २ महिन्यापासून रहात आहे. साडेबाराच्या सुमारास जखमी मुलगी किरण हिचा मारेकरी पती नागेश रूपवते हा त्याचे घरी येवुन किरण हिला त्याचे सोबत नांदण्यास का येत नाही याकारणावरून तिचेशी भांडण करू लागला. त्यातच त्याने त्याच्या जवळ असलेल्या चाकुने किरण हिचे गळ्यावर, पोटावर, दोन्ही हाता- पायावर वार केले. त्यावेळी तिची मैत्रीण ज्योती ही तिला वाचविण्यासाठी मध्ये आली असता नागेश याने ज्योती हिच्या गळ्यावर, पोटावर भोसकुन व वार करून तिला गंभीर जखमी करून तो तेथून पळुन गेला असे सांगितले. जखमींना तात्काळ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. त्यावेळी ज्योतीला डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती बापुराव कोल्हटकर यांचे मार्गदर्शनाखाली मारेकरी नागेश रूपवते याचा शोध घेवून त्याला दोन तासांच्या आत अटक केली. त्याने त्या गुन्ह्याची कबुली दिली असून २२ मे २३ पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. अशी माहिती मुंब्रा पोलिसांनी दिली. या गुन्हयाचा पुढील तपास पो. निरीक्षक संजय पवार करीत आहेत.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# मीरा भाईंदर चॅलेंजर लीग क्रिकेट चषक ठाण्याच्या श्री माँ विद्यालयाने जिंकला




**ठाणे:** १६ वर्षांखालील मीरा भाईंदर चॅलेंजर लीग क्रिकेट चषक श्री माँ विद्यालयाने ब्रॉवो क्रिकेट अकादमीचा पराभव करत पटकावला. ६१ चेंडूत ९२ धावांची खेळी करणारा श्री माँ विद्यालयाचा रुजुल रांजणे सामनावीरचा मानकरी ठरला.

मीरा भाईंदर येथील क्रिडांगणात मीरा भाईंदर चॅलेंजर लीग क्रिकेट चषक स्पर्धेचा अंतिम सामना श्री माँ विद्यालय आणि ब्रॉवो क्रिकेट अकादमी यांच्यात खेळला गेला. नाणेफेक जिंकत ब्रॉवो क्रिकेट अकादमीने क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. श्री माँ विद्यालयाचे सलामीवीर रुजूल रांजणे आणि पार्थ देशमुख यांनी पहिल्या विकेटसाठी १५५ धावांची भागीदारी केली. रुजूल रांजणे याने ६१ चेंडूत ३ षटकार आणि १० चौकार मारत ९२ धावांची खेळी केली. तर पार्थ देशमुख याने ५५ चेंडूत नाबाद ६१ धावांची खेळी केली. श्री माँ विद्यालयाने २० षटकात २ गडी बाद १८० धावा केल्या. ब्रॉवो क्रिकेट अकादमीने लक्ष्याचा पाठलाग करताना सलामीवीर पंकज सिंग आणि गणेश यांनी ५६ धावांची भागीदारी करत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या. मात्र मध्यमगती वेगवान गोलंदाज अथर्व सुर्वे याने आपल्या दोन षटकात दोन गडी बाद करत ब्रॉवो क्रिकेट अकादमीला सुरुवातीलाच धक्के दिले. त्यांनतर रुद्र चाटभर आणि ऋग्वेद जाधव यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले तर ३ फलंदाज धावचीत झाले. ब्रॉवो क्रिकेट अकादमी संघाने २० षटकात ९ गडी बाद १५५ धावा केल्या. श्री माँ विद्यालयाने हा सामना २७ धावांनी जिंकत मीरा भाईंदर चॅलेंजर लीग क्रिकेट चषकावर आपले नाव कोरले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे मोफत दाखले वाटप शिबिर संपन्न

**ठाणे :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रविवारी २१ मे रोजी ठाण्यातील वागळे इस्टेट येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भव्य दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. लवकरच शालेय वर्ष सुरू होणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांची गरज भासत असते. त्याच अनुषंगाने सेंट लॉरेन्स हायस्कूल, डिसोझा वाडी, वागळे इस्टेट, ठाणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे-पालघर समन्वयक तथा ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने या मोफत दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मोफत दाखले वाटप शिबिरामध्ये रहिवास दाखला, अधिवास दाखला (डोमेसाईल), ज्येष्ठ नागरिक दाखला, उत्पन्नाचे दाखल्यांचे माजी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# विकासकामा अंतर्गत सुरू असलेल्या रस्त्यांची कामे ६० ते ७० टक्के पूर्ण

(पान १ वरून)

सर्व कार्यकारी अभियंत्यांनी सुरू असलेल्या कामांचा वेळोवेळी दर्जा तपासून संबंधित ठेकेदारास त्या प्रमाणे सूचना करुन गुणवत्तापूर्वक रस्ते तयार होतील यासाठी कटाक्ष ठेवावा. रस्त्यांची कामे करत असताना कलव्हर्ट, जॉईंट फिलींग, लेन मार्किंग, झेब्रा क्रॉसिंगची कामे देखील एकमार्गी पूर्ण करावीत. ठेकेदारांची बिले अदा करण्यात आली आहे, त्यामुळे बिले अदा झाली नाही ही सबब चालणार नाही तसेच नव्याने तयार झालेल्या रस्त्यांची कामे जर खराब झाली तर ती खपवून घेतली जाणार नाही असा सूचक इशाराही या बैठकीत आयुक्त बांगर यांनी दिला.

सध्या मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्यामुळे अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहे आणि वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना असुविधेचा सामना करावा लागत आहे, याची जाणीव ठेवून सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण कशी होतील यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करावेत अशा सूचनाही या बैठकीत दिल्या. कामे चालू असताना लोकप्रतिनिधी, नागरिक यांच्याकडून कामाबाबत जो फिडबॅक मिळतो, तो तपासून घ्यावा व त्यामध्ये काही कार्यवाही करण्यायोग्य मुद्दे आढळल्यास त्याची अंमलबजावणी व्हावी असेही आयुक्तांनी नमूद केले.

ठाणे शहरासाठी राज्य शासनाकडून ६०५ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. या अंतर्गत सध्या २८२ रस्त्यांची कामे प्रभागसमितीनिहाय सुरू आहेत. त्याशिवाय, महापालिकेच्या निधीतून सुरू असलेली रस्त्यांची कामे, सरकारी योजनांमधून सुरू असलेली रस्त्यांची कामे, इतर प्राधिकरणांमार्फत सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांचा आढावा या बैठकीत आयुक्तांनी घेतला. ठाणे महापालिका हद्दीत २१४ कोटी अंतर्गत १२७ रस्त्यांची कामे सुरू आहेत तर ३९१ कोटी अंतर्गत १५५ रस्त्यांची कामे सुरू आहेत. या बैठकीस नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपनगरअभियंता रामदास शिंदे, विकास ढोले तसेच सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

शहरात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांचा तपशील पुढील प्रमाणे.

| प्रभाग समिती | | सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांची संख्या |
|---|---|---|
| दिवा | – | ६४ |
| कळवा | – | २० |
| लोकमान्य सावरकर | – | २० |
| माजिवडा मानपाडा | – | ४९ |
| मुंब्रा | – | २६ |
| नौपाडा कोपरी | – | ३० |
| उथळसर | – | २५ |
| वर्तकनगर | – | २६ |
| वागळे | – | २२ |
| एकूण | – | २८२ |

### रस्त्यावरील डेब्रीज उचलणे, फलक लावणे

रस्त्याची कामे करीत असताना रस्त्यावर पडलेले डेब्रीज तातडीने उचलले गेले पाहिजे. रस्त्याची कामे सुरू असलेल्या ठिकाणी नागरिकांना दिसतील अशा पध्दतीने फलक लावा जेणेकरुन त्याचा चांगला परिणाम दिसून येतो. रस्त्यांची कामे ही पावसाळ्यापूर्वी पूर्ण करुन घेण्यासाठी तिन्ही पाळ्यांमध्ये काम सुरू ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### विविध प्राधिकरणाशी समन्वय ठेवून कामे पूर्ण करा

शहरात विविध प्राधिकरणाची कामे सुरू आहेत. घोडबंदर रोडवर तसेच ज्या ठिकाणी मेट्रोची कामे सुरू आहेत, त्या प्राधिकरणाशी चर्चा करुन कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने मार्ग काढावा. रस्त्यावर खड्डा पडलेला अजिबात खपवून घेणार नाही असेही त्यांनी नमूद केले.

### नागरिकांच्या तक्रारींची दखल घ्या.

ठाणे शहरातील जागरूक नागरिक हे रस्त्यांच्या तक्रारी या सोशल मिडीयावर उदा. फेसबुक, ट्विटरवरुन मांडत असतात. नागरिकांनी रस्त्यांच्या कामांबाबत तक्रार केली असल्यास त्याची तात्काळ दखल घेवून त्यावर उपाययोजना करा. तसेच ज्या ठिकाणी कामे पूर्ण करताना अडथळा निर्माण होत असेल किंवा स्थानिक नागरिक हस्तक्षेप करत असतील तर संबंधित विभागाच्या लोकप्रतिनिधी संपर्क साधून कामे करा अथवा पोलीस बंदोबस्तात काम करुन घ्या असे आयुक्तांनी नमूद केले.

# वारंवार अपघात होणाऱ्या गणेश पाड्यातील त्या गटाराचे बांधकाम अखेर सुरू

## मनसेच्या प्रयत्नांना यश

**दिवा:–** आमदार राजू पाटील यांच्या निर्देशानंतर अखेर पालिका प्रशासनाला जाग आली असून गणेश पाडा येथील अपघात प्रवण गटाराचे काम सुरू करण्यात आले आहे.दिवा मनसेच्या वतीने सदर तुटलेल्या गटारा बाबत पालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता .

गणेश पाडा येथून दातीवली समांतर रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्याच्या मधोमध असलेल्या गटारावरील स्लॅब तुटल्यामुळे तिथून येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकीस्वारांचे तोल जाऊन वारंवार अपघात घडत होते. या संदर्भात गणेश पाड्यातील मनसेचे शाखाध्यक्ष सुशांत तांडेल आणि मनविसे शाखाध्यक्ष धनेश पाटील यांनी वारंवार महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. याप्रकरणी दिवा प्रभाग समिती कार्यालयात शहर सचिव प्रशांत गावडे आणि विभाग सचिव परेश पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी संपूर्ण गटार नवीन बांधण्यात येणार असून त्याची फाईलही मंजूर झाल्याचे सांगण्यात आले होते.



पण दरम्यानच्या काळात गटारावरील स्लॅब मोठ्या प्रमाणात तुटल्यामुळे त्यात अडकून दुचाकीस्वारांचे अपघात होण्याची संख्या वाढत गेली. याबतीत मनसे शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी ट्विटर च्या माध्यमातून ठाणे महापालिकेकडे पुन्हा तक्रार केली, तसेच होणाऱ्या अपघातांचे सीसीटीव्ही विडिओ सहाय्यक आयुक्त प्रितम पाटील यांना पाठवून दिले. त्यानंतर काम सुरू करण्यासाठी खडी आणि भुसा आणून टाकण्यात आला पण प्रत्यक्षात कामाला मात्र सुरवात करण्यात आली नाही.

काल एका दिवसात ३ अपघात झाल्यानंतर तुषार पाटील यांनी सहाय्यक आयुक्तांना हे विडिओ पाठवून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. त्यानंतर तात्काळ तात्पुरता स्वरूपात अपघात टाळण्यासाठी तिथे नवीन झाकणं आणून टाकण्यात आली.

काल मनसे आमदार राजू पाटील हे दिवा शहरातील कामांचा आढावा घेण्यासाठी दिव्यात आले असताना शहर अध्यक्ष तुषार पाटील, शाखाध्यक्ष सुशांत तांडेल आणि धनेश पाटील यांनी हा विषय आमदार राजू पाटील यांच्या निदर्शनास आणून देऊन कशाप्रकारे महापालिका प्रशासन काम करण्यास चालढकल करीत आहे याची माहिती दिली. यावर आमदार राजू पाटील यांनी काल तात्काळ संबंधित गटाराचे काम सुरू करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते आणि आज दिनांक १९ मे २०२३ पासून या गटाराच्या कामाला महापालिकेकडून कामाला सुरुवात करण्यात आली.

# साबे गावात संपन्न होणार गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

**साबे:–** साबे गावातील गावदेवी चिचुआई मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा २२ ते २४ मे दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन साबे गाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. गावदेवी चिचुआई मंदिराच्या जीर्णोद्धार सोहळ्याच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून यामध्ये २२ मे रोजी होम हवन,भजन,२३ मे रोजी होम हवन व गावदेवी पालखी सोहळा,तर २४ मे रोजी जीर्णोद्धार विधी व महाप्रसाद असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक साबे गाव ग्रामस्थांनी केले आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी २५ मे पासून ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**ठाणे :** राज्य शासनाच्या वतीने शिक्षकांना दरवर्षी शिक्षक दिनानिमित्त प्रातिनिधिक स्वरुपात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सन २०२२-२३ च्या या पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून नाव नोंदणी दि.२५ मे २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सुरू होणार आहे.

या पुरस्कारासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक/माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी दि. १५ जून २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ऑनलाईन नोंदणी करावयाची आहे, असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक पुणे यांनी केले आहे.

# खदानीत बुडून बालकाचा मृत्यू

**ठाणे:** दिवा, बेतवडे गाव या ठिकाणी असलेल्या खदानीमध्ये पोहण्याकरिता गेलेल्या दिवा पूर्व, दादूस नगर येथील रोहित सूर्यभान राऊत या १६ वर्षीय बालकाचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास समोर आली. रोहित सोबत त्याचा लहान भावासह अन्य मुलेही पोहण्यासाठी गेले होते. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मुंब्रा पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्या बालकाचा मृतदेह बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिले. अशी माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# दातीवली गावातील हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा!



दातीवली:– दातिवली येथील हनुमान मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा २० व २१ मे रोजी मोठ्या भक्ती भावाने साजरा झाला.

या सोहळ्याला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

या सोहळ्याच्या निमित्ताने मंदिराची वास्तुशांती व होम हवन, चक्रीय भजन,श्रींची मिरवणूक व गाव प्रदक्षिणा, महाप्रसाद असे कार्यक्रम शनिवार २० मे रोजी आयोजित करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी २१ मे रोजी कलश पूजन, श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना,होम हवन, महिलांसाठी विशेष कार्यक्रम, खेळ पैठणीचा, हरिपाठ, कीर्तन, भंडारा व ऑर्केस्ट्रा अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नागरिकांसाठी भव्य आरोग्य शिबिर देखील आयोजित करण्यात आले होते.










# अमर टॉवर इमारत दुर्घटनाग्रस्त जखमी कुटुंबियांना मुख्यमंत्र्यांकडून मदतीचा हात



**ठाणे :** नौपाडा येथील भास्कर कॉलनी मधील अमर टॉवर या इमारतीचा स्लॅब सोमवारी कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत विजया मोहन सुर्यवंशी, त्यांची दोन मुले प्रथमेश व अथर्व सूर्यवंशी हे तिघे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेची तातडीने दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जखमीची विचारपूस करत उपचारामध्ये कोणतीही हयगय होणार नाही अशा सूचना देवून या कुटुंबाला तीन लाख रुपयांची मदत दिली. ही मदत शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश समन्वयक नरेश म्हस्के यांनी विजया सूर्यवंशी यांच्याकडे बुधवार १७ मे रोजी सुपुर्द केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ठाण्याकडे लक्ष असून या दुर्घटनेचे वृत्त समजताच त्यांनी तातडीने या दुर्घटनेतील जखमींची विचारपूस केली. सूर्यवंशी कुटुंबाला उपचारासाठी त्यांनी आज तीन लाख रुपयांची मदत देवून आर्थिक सहकार्य केले. शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश समन्वयक नरेश म्हस्के यांनी सूर्यवंशी कुटुंबियांची भेट घेवून सदरची मदत सुपुर्द केली. यावेळी माजी नगरसेवक भास्कर पाटील, शिवसेनेचे विभागप्रमुख किरण नात्ती, शिवसेनेचे पदाधिकारी तसेच अमर टॉवर सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

अमर टॉवर इमारतीच्या दुर्घटनेचे वृत्त समजताच शिवसेनेचे विभागप्रमुख किरण नात्ती यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचून जखमींना मदतकार्य सुरू केले तसेच सूर्यवंशी कुटुंबातील जखमींना नौपाड्यातील पराडकर रुग्णालय व कौशल्य रुग्णालय येथे दाखल केले असून सर्वांची प्रकृती स्थिर असून विजया सूर्यवंशी यांना बुधवारी रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. शिवसेना प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी आज या दुर्घटनाग्रस्त इमारतीची पाहणी केली. ती इमारत ही २५ वर्षे जुनी असून या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट करुन घेण्याबाबत सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना सूचित केले. तसेच या इमारतीचा पुनर्विकास करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांच्या वतीने रहिवाशांना दिले.



# अपघाती निधन झालेल्या पोलिसाच्या कुटुंबाला मिळाले १ कोटी रुपये

## पोलीस आयुक्तांच्या हस्ते सुपूर्द केला धनादेश

**ठाणे:** मोटार अपघातामध्ये निधन पावलेले पोलीस शिपाई घनश्याम ब्रम्हदेव गायकवाड यांच्या कुटुंबाला विम्याचे १ कोटी रुपयांचा धनादेश एचडीएफसी बँकेने दिले. हा धनादेश घनश्याम यांच्या मातोश्री मंगल गायकवाड यांनी गुरुवारी ठाणे शहर पोलीस आयुक्त जय जित सिंह यांच्या हातून स्वीकारला. याप्रसंगी अप्पर पोलीस आयुक्त डॉ महेश पाटील यांच्यासह बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

ठाणे शहर पोलीस दलामध्ये नौपाडा पोलीस ठाण्यात नेमणूकीस असलेले पोलीस शिपाई घनश्याम ब्रम्हदेव गायकवाड हे १२ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्र पाळीच्या डयुटीवर कर्तव्य बजावताना पहाटे चार वाजून २१ मिनिटांच्या सुमारास नितीन कंपनी ब्रिजजवळ त्यांचा अपघात झाला. त्या अपघातात त्यांच्या डोक्यास गंभीर दुखापत होवून त्यांचे निधन झाले.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाने त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पगार खाते एचडीएफसी बँकेत ठेवण्याबाबत करार केलेला आहे. या करारांतर्गत पोलीस दलातील कोणत्याही कर्मचाऱ्याचे अपघातात निधन झाल्यास रुपये १ कोटी विमा बँकेने देवू केले आहे. तर ,पोलीस शिपाई घनश्याम गायकवाड यांचे अपघातात निधन झाल्याने अपघात विमा दावा बँकेत सादर केला असता, बँकेने तातडीने दावा मंजुर करून अपघात विमा रक्कम एक कोटींचा धनादेश दिवंगत घनश्याम गायकवाड यांची आई मंगल गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

# बाळासाहेब ठाकरे चौपाटीवर गणेशोत्सवापुर्वी विर्सजन घाट न झाल्यास आंदोलनाचा इशारा – आमदार सरनाईक

**ठाणे :** घोडबंदर रोडवरील बाळासाहेब ठाकरे चौपाटी टप्पा क्रमांक २ वर विसर्जन घाट आणि दशक्रिया विधी घाटाचे काम गणेश उत्सवापूर्वीच पूर्ण करा अशा सूचना आमदार प्रताप सरनाईक यांनी ठाणे महापालिका अधिकाऱ्यांनी केल्या आहेत. मंगळवारी आमदार आणि महापालिका अधिकाऱ्यांनी त्या चौपाटीचा पाहणी दौरा केला. यावेळी आमदारांनी सूचना केल्या आहेत. तसेच उर्वरीत लँडस्केपींग गार्डन, पाथवे, सायकल ट्रॅक, जॉगिंग ट्रॅक ही सर्व कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत सांगितले आहे. याचदरम्यान जर गणेश उत्सवापुर्वी विर्सजन घाट व दशक्रिया विधी घाट पूर्ण झाला नाही तर सत्ताधारी पक्षाचा आमदार असूनही मला लोकांच्या हितासाठी आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही. असा इशारा ही त्यांनी दिला आहे.




या पाहणी दौऱ्यात कासारवडवली, भाईंदरपाडा, ओवळा येथील सर्व नागरिकांनी भेटून विर्सजन घाट व दशक्रिया विधी घाट लवकरात लवकर पुर्ण करून देण्याची मागणी आमदार सरनाईक यांच्या केली. यावेळी महापालिकेचे अधिकारी मोहन कलाल यांच्या आदी अधिकाऱ्यांसह माजी नगरसेविका साधना जोशी, विद्युत विभागाचे रोकडे, वाहतुक पोलिस निरिक्षक संदीप सावंत तसेच मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून मेरी टाईम बोर्ड व ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून आमदार सरनाईक यांच्या पाठपुराव्यामुळे सुरू असलेल्या गायमुख येथील स्व. बाळासाहेब ठाकरे चौपाटीचा टप्पा क्रं. १ नागरिकांसाठी खुला करण्यात आला असून चौपाटीचा टप्पा क्रं. २ वर विर्सजन घाट व दशक्रिया विधी घाटाचे काम अपूर्ण असल्याने लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात सूचना केल्या. तसेच आमदार सरनाईक यांच्या आमदार निधीतून घोडबंदर रोडवर अद्ययावत सिग्नल यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सिग्नल यंत्रणा कुठे बसवावी त्याची देखील पाहणी वाहतुक शाखेच्या अधिकाऱ्यांसमवेत केली. तर चौपाटीचे काम पुर्ण झाल्यानंतर अनेक पर्यटक, नागरिक तेथे येणार असल्याने भविष्यात गाड्या पार्किंगचा प्रश्न उद्भवू शकतो, यासाठी चौपाटीवर किमान २०० गाड्यांची पार्किंग व्यवस्था करण्यात यावी तसेच या प्रकल्पासाठी ज्या नागरिकांच्या जमिनी जाणार आहेत, त्यांचे देखील पुर्नवसन लवकरात लवकर करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना मोहन कलाल यांनी दिले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, २२ मे २०२३



# कोरियामध्ये ठाण्याच्या ॲथलिट डॉ. हेता ठक्कर-राय आणि अमित प्रभू यांनी उत्कृष्ट कामगिरी



**ठाणे:** आशिया पॅसिफिक मास्टर गेम्स जिओनबुक, कोरिया २०२३ या ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये ठाण्याच्या डॉ. हेता ठक्कर-राय आणि अमित प्रभू यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

डॉ. हेता ठक्कर-राय हिने तीन स्पर्धांमध्ये ३ सुवर्णपदक पटकावले. १०० मीटर, २०० मीटर आणि ४०० मीटरमध्ये ३ सुवर्णपदके जिंकल्याबद्दल हेताचे अभिनंदन होत आहे.

अमित प्रभू यांनी ८०० मीटरमध्ये सुवर्ण आणि ४०० मीटरमध्ये रौप्यपदक जिंकले. अशाप्रकारे या दोघांनी एकूण ४ सुवर्ण आणि १ रौप्यपदक पटकावले. ज्यांनी प्रोत्साहन दिले तसेच पाठिंबा दिला त्या सर्वांचे त्यांनी आभार मानले आहेत.

हेता हिने ३० वर्ष वयोगटामध्ये तर अमित प्रभू यांनी ४५ वर्ष गटामध्ये भाग घेतला होता. एम्स स्पोर्ट्स् फाऊंडेशनचे संस्थापक व प्रशिक्षक डॉ. अजित कुलकर्णी यांच्याकडे हे दोघेही प्रशिक्षण घेत आहेत. श्री माँ गुरुकुल आणि वसंत विहार क्लब हाऊस मैदानावर हे दोघे सराव करतात. डॉ. हेता ठक्कर-राय या डॉ. अजित कुलकर्णी यांच्याकडे गेली २३ वर्षे सराव करत आहेत. दोघांनी या स्पर्धेसाठी अपार मेहनत घेतली असल्याचे डॉ. अजित कुलकर्णी यांनी सांगितले.

# दहशत पसरविणाऱ्या तिघांना केले १ वर्षाकरिता ठाणे पोलिसांनी स्थानबद्ध

**ठाणे:** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयामधील कासारवडवली, कळवा व उल्हासनगर या पोलीस ठाण्याच्या हद्दीत दहशत पसरविणाऱ्या जी बी रोडवरील डोंगर पाडा येथील कुप्रसिध्द गुंड धिरज उर्फ विकी संतोष रेडडी (२९), कळवा पूर्व येथील कुप्रसिध्द गुंड सोनु ओंमकार पवार (२६) आणि उल्हासनगर नंबर २ येथील कुप्रसिध्द गुंड जग्गू सरदार उर्फ जगदीश तिरथसिंग लबाना (४०) या ३ अट्टल गुन्हेगारांवर एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई ठाणे शहर पोलीस आयुक्त जय जित सिंह यांनी केली. त्यांना एक वर्षाकरिता स्थानबद्ध केले आहे.

विकी रेडडी, याच्यावर कासारवडवली पोलीस ठाण्यात जिवे ठार मारण्याचा प्रयत्न, जबरी चोरी, गंभीर दुखापत, दुखापत, दमदाटी व शिवीगाळ करणे, धमकी देणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे, बेकायदेशीररित्या हत्यार बाळगणे असे ५ गुन्हे असल्याने त्याच्याविरूध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई करून त्याला १ वर्षाकरिता पुणे येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबध्द करण्यात आले आहे. तर सोनु पवार याच्यावर ही कळवा पोलीस ठाण्यात जबरी चोरी करण्याचा प्रयत्न, घरफोडी, चोरी, गंभीर दुखापत, दुखापत, शिवीगाळ करणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे असे एकुण ६ गुन्हे दाखल असल्याने त्याच्याविरूध्द एम. पी. डी. ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई करून त्यालाही एक वर्षाकरिता पुणे येरवडा कारागृह येथे स्थानबध्द करण्यात आले आहे. तसेच जगदीश लबाना, याच्यावर उल्हासनगर पोलीस ठाण्यात खंडणी, दुखापत, घराविषयी आगळीक, विनयभंग, शिवीगाळ, धमकी देणे, असे ६ गुन्हे दाखल असल्याने त्याच्या विरूध्द एम.पी. डी.ए. कायदयांन्वये स्थानबध्दतेची कारवाई करून त्यालाही १ वर्षासाठी पुणे येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील ३४ तृतीय पंथीयांना मिळाले ओळखपत्र

**ठाणे:** समाजातील मुख्य प्रवाहातून दूर किंवा दुर्लक्षित असलेल्या घटकांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठाणे महसूल विभागाने आता पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील १४० तृतीय पंथीयापैकी ३४ तृतीय पंथीयांना सन्मानाने जगता यावे ह्या साठी ठाणे तालुक्यांतील तृतीय पंथीयाना मुख्यमंत्री यांची संकल्पना ''जत्रा शासकीय योजनाची सर्व सामान्यांच्या विकासाची '' या अंतर्गत ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या आदेशानुसार तहसीलदार युवराज बांगर यांनी ओळखपत्र व संजय गांधी निराधार योजना प्रमाणपत्राचे वाटप गुरुवारी वाटप केले. दरम्यान तृतीय पंथीयांनी आपल्या हक्काची घर मिळण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे अशी विनंती केली.

पाठीराखा प्रतिष्ठानचे केशव जोशी यांच्या पाठपुराव्याने ह्या तृतीय पथीयांना हा सन्मानाने जगता येणार आहे.तर आपल्याला ओळख मिळाल्याने तृतीय पंथीयानी तहसिलदार युवराज बांगर,नायब तहसिलदार दिनेश पैठणकर,संजय गांधी निराधार योजना नायब तहसिलदार दत्ता बेर्डे या मंडळींचे आभार मानले.

# टीएमसीएपीवायने ओव्हरऑल चॅम्पियनशिप जिंकून दुसऱ्यांदा आपले वर्चस्व कायम राखले

**ठाणे: मुंबई प्रियदर्शनी पार्क येथे ११ ते १२ मे रोजी पार पडलेल्या ठाणे जिल्हा वरिष्ठ ॲथलेटिक चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धेत ओव्हरऑल चॅम्पियनशिप जिंकून ठाणे महापालिका अथलेटिक प्रशिक्षण योजना (टीएमसीएपीवाय) ने दुसऱ्यांदा आपले वर्चस्व कायम ठेवले.**




टीएमसीएपीवाय ने महिला चॅम्पियनशिप जिंकली आणि पुरुष चॅम्पियनशिप फक्त काही गुणांनी हुकली. तसेच या स्पर्धेत टीएमसीएपीवायच्या खेळाडूंनी ८ सुवर्णपदकांसह १५ रौप्य आणि १२ कांस्य अशा ३५ पदकांची लयलूट केली आहे. पुरुष गटात हर्ष राऊत याला १०० मीटर आणि २०० मीटर स्पर्धेत कांस्यपदक समाधान मानावे लागले आहे. आल्फ्रेड फ्रान्सिस याने ८०० मीटर स्पर्धेत रौप्य आणि ४०० मीटर स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. अभिषेक बोरखडे यानेही १५०० मीटर स्पर्धेत रौप्य आणि ८०० मीटर स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. अली शेख याने ४०० मीटर स्पर्धेत रौप्यपदक, अजय माखिजा यालाही १०००० मीटर स्पर्धेत कांस्य, ऋषभ यादव यालाही मीटर स्पर्धेत कांस्य, कृष्णा मोरे यालाही डिस्कस थ्रो मध्ये कांस्य, रितेश बच्छाव, निखिल ढाके, अली शेख, हर्ष राऊत या चौघांनाही ४ १०० मीटर रिले स्पर्धेत रौप्य, अली शेख, विनायक, निखिल ढाके, आल्फ्रेड फ्रान्सिस या चौघांना ४ ४०० मीटर रिले स्पर्धेत रौप्यपदकांवर समाधान मानावे लागले आहे. तर महिला गटात निधी सिंग हिने ४०० मीटर आणि ४०० मीटर या दोन्ही स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली आहे. तर अदिती पाटील हिने १५०० मीटर आणि ५००० मीटर या स्पर्धांमध्ये सुवर्णपदक आपल्या नावावर केले आहे. सानिका नाटे हिनेही १०० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे. आकांक्षा गावडे हिने २०० आणि ४०० मीटर स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. अर्पिता गावडे हिने लांब उडीत रौप्य आणि ४०० मीटर स्पर्धेत कांस्यपदकाची कामगिरी केली. चारवी पावशे हिने शॉट पुट मध्ये रौप्य, साक्षी पाटील हिने ४०० मीटर स्पर्धेत कांस्य, नतालिया फर्नांडिस हिने लांब उडीत कांस्य तसेच शोभा ढोरे हिला १५०० मीटर स्पर्धेतीत कांस्यपदकावर समाधान मानावे लागले आहे.

# टीएमटी तेजस्विनी बसला आग



## मात्र सर्व प्रवासी सुखरूप

**ठाणे:** सुमारे १५ प्रवासी घेऊन आलिमघरकडून ठाणे रेल्वे स्टेशनला निघालेल्या ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेच्या तेजस्विनी नावाच्या बसला शनिवारी दुपारी आग लागल्याची घटना समोर आली. त्या बस मध्ये बसलेल्या प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले असून बसचालक, वाहक, स्थानिक रहिवाशी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने त्या आगीवर नियंत्रणात मिळविण्यात यश आले. या बसच्या स्टार्टरमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आग लागल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेच्या आनंद नगर आगारची एमएच ०४ केएफ ४०४२ ही बस चालक योगेश करंडे आणि वाहक पूनम कडव हे दोघे सुमारे १५ प्रवासी घेऊन आलिमघरकडून ठाणे रेल्वे स्टेशनला निघाले होते. बस कळवा,पारसिक नगर, येथे आल्यावर बसच्या स्टार्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली. बसमधून धूर येताना पाहून प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती. या आगीची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली. त्यांनी वाहन चालक-वाहक आणि स्थानिकांच्या मदतीने अवघ्या दहा मिनिटात आग नियंत्रणात आणली. त्या बसमधून सुमारे १५ प्रवाशी प्रवास करत होते. त्या प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आलेली आहे. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# क्षयरोग रुग्णांसाठी हवी महापालिकेला दानशूरांची साथ

**ठाणे:** केंद्र सरकार पाठोपाठ क्षयरोगाचा मोबाईल अॅप बनविणारी स्थानिक स्वराज्य संस्थेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वर्चस्व असलेली ठाणे महापालिका ही देशातील पहिली महापालिका असल्याचा टेंबा मिरवीत आहे. मात्र याच क्षयरोग रुग्णांसाठी रेशन साहित्य किट उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेला आता प्रखरतेने दानशूरांची कमतरता बसत आहे. रेशनची गरज असलेल्या ३ हजार रुग्णांपैकी १ हजार ३०० म्हणजे अर्ध्यापेक्षा कमी रुग्णांना अवघ्या ३२ दानशूरांमुळे ते रेशन साहित्य किट उपलब्ध होत आहे. अशा दानशुरांमध्ये महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी अक्षरशः तोकडाच हात घेतल्याने महापालिकेची अवस्था 'नाव मोठे आणि लक्षण खोटे' अशी झाली आहे. याबाबत मुख्यमंत्रांसह आयुक्तांनी वेळीच जर लक्ष घातले तर दानशूरांची रीघ लागले आणि पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभिमान किमान ठाणे शहर यशस्वी होईल. अन्यथा दानशूरांची प्रतीक्षा करण्याशिवाय दुसरा पर्यायच नाही अशी माहिती सूत्रांनी दिली.

ठाणे महापालिका हद्दीत गेल्या वर्षी क्षयरोगाचे ८ हजार ६० तर या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यात २ हजार ५०० रुग्ण आढळून आले आहे. त्या सर्वांवर उपचार सुरू आहेत. यामध्ये आर्थिक परिस्थिती नसलेल्या रुग्णांना त्यांच्या मागणीनुसार रेशन दिले जाते. त्यानुसार शहरात ३ हजार रुग्णांना रेशनची गरज असल्याची नोंद आहे. त्यापैकी अवघ्या १ हजार ३०० जणांना रेशन उपलब्ध करून देण्यात महापालिकेच्या आरोग्य विभागाला यश आले आहे. हे रेशन ३२ दानशूर दात्यांच्या मदतीने वाटप केले जाते. मात्र उर्वरीत रुग्ण अद्यापही रेशन किटच्या प्रतिक्षेत आहेत. यासाठी ठामपा आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. पण, त्यांच्या त्या प्रयत्नाला यश येताना दिसत नसल्याने ते दानशूरांच्या शोधत आहेत.

क्षयरोग रुग्णाला सहा महिने रेशन दिले जाते. यामध्ये पाच किलो तांदूळ,५ किलो गहू, एक किलो तेल,१ किलो शेंगदाणे आणि तीन किलो डाळ असे दिले जाते. या एका किटसाठी एक हजार रुपये खर्च येत असून ते किट संबंधित दानशूरांच्या उपस्थिती वाटप केले जाते. दानशूरांनी दत्तक योजनेनुसार रुग्ण दत्तक घेऊन ते किट वाटप करायचे आहे. किती रुग्ण दत्तक घेता येतात. यामध्ये त्या दानशूर दात्याला इन्कटॅक्समध्ये बेनिफिट मिळते. त्यामुळे दात्यांनी पुढे यावे असे आवाहन महापालिका सूत्रांनी केले आहे.

ठामपा हद्दीत ३२ दानशूरांनी १ हजार ३०० जणांना दत्तक घेतले आहे. त्यामधील ठामपा आरोग्य विभागातील ८ जणांनी २४ जणांना दत्तक घेतले आहे. मात्र महापालिकेच्या इतर विभागांनी किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रुग्ण दत्तक न घेता आपला हात तोकडा ठेवला आहे. एक रुग्णांला महिन्याला एक हजार खर्च असून असे सहा महिन्याचे सहा हजार खर्च येत आहे. त्यामुळे आता कोणता विभाग किंवा कोणते अधिकारी पुढे येतात हेच पाहावे लागणार आहे.

# 'शासन आपल्या दारी' उपक्रम मिशन मोडवर राबवावे

## – जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

ठाणे: शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या जीवनात दर्जात्मक व गुणात्मक सुधारणा घडविण्यासाठी 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम महत्वाचा आहे. जिल्ह्यात हा उपक्रम मिशन मोडवर राबविण्यासाठी प्रत्येक प्रशासकीय यंत्रणांनी दोन पाऊले पुढे येण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले. येत्या आठ दिवसांत जिल्ह्यातील योजनांच्या लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

राज्य शासनाच्या 'शासन आपल्या दारी' या उपक्रमाच्या पूर्व तयारीची बैठक बुधवारी जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे, उपविभागीय अधिकारी अविनाश शिंदे, अभिजित भांडेपाटील, अमित सानप, जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक छायादेवी सिसोदे, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे, जिल्हा कृषि अधिक्षक दीपक कुटे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त वल्लभ जोशी यांच्यासह जिल्ह्यातील विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.सर्वसामान्य जनता, शेतकरी, महिला, विद्यार्थी यांचा राज्य शासनातील विविध विभागाशी दैनंदिन संबंध येत असतो. शासनाच्या योजनांचा, उपक्रमांचा लाभ सर्वसामान्यांना त्वरीत मिळावा तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम आणि गतिमान होण्यासाठी 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातही या उपक्रमाच्या माध्यमातून शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोचवून त्यांना लाभ देण्यात येणार आहे. यासंदर्भात आज पूर्व तयारी बैठक पार पडली.



# आमदार केळकराकडून पत्रकार संघाला ४ संगणक संच भेट

**ठाणे:** पत्रकार म्हटले की कागद आणि पेन या दोन महत्त्वाच्या वस्तू पूर्वीच्या काळात हाताळल्या जात होत्या. मात्र आधुनिक काळात मोबाईल आणि संगणकीय युग असल्याने पत्रकारिता क्षेत्रातही बदल झाले आहेत.याच अनुषंगाने पत्रकार तसेच छायाचित्रकारांना संगणकाची अत्यंत गरज भासत असल्याने ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाने केलेल्या मागणीनुसार पत्रकार संघाला ठाणे विधानसभा क्षेत्राचे भाजपचे आमदार केळकर यांच्याकडून ४ संगणक भेट देण्यात आले आहेत.

सध्याच्या काळात संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून वेब पत्रकारिता उदयास आली आहे. सोशल मीडिया,वेब न्यूज पोर्टल्स,वेब चॅनल्स, ट्विटर, फेसबुक, व्हाट्सअप, युट्युब यांसारख्या वेब माध्यमांचे जाळे पसरले असल्याने सर्वच कामे संगणकाशिवाय होऊ शकत नाही. याच पार्श्वभमीवर ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाने भाजपचे आमदार संजय केळकर यांच्याकडे संगणकाची मागणी केली होती.

पत्रकारांच्या वाढत्या सदस्यामुळे संगणक अपुरे पडत असल्याने नवीन ४ संगणक केळकर यांनी भेट म्हणुन दिले. यावेळी ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे यांच्या उपस्थितीत पत्रकार कक्षेत पहिल्या टप्पात २ संगणक सुपूर्द करण्यात आले. तर येत्या काही दिवसांत उर्वरित २ संगणक देण्यात येणार असल्याची ग्वाही केळकर यांनी दिली. यावेळी परिवहन सदस्य विकास पाटील, कार्याध्यक्ष विकास काटे, खजिनदार विभव बिरवटकर यांच्यासह कार्यकारणी सदस्य आणि अनेक पत्रकार उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com



# वापरलेल्या आणि सुस्थितीत असलेल्या वस्तू ठाणेकरांनी 'आरआरआर' केंद्रांवर द्याव्यात!

## ठाण्यात ३३ ठिकाणी 'ट्रिपल आर' केंद्रे सुरू

**ठाणे :** केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन - अर्बन २.०' अंतर्गत 'माझे जीवन, माझे स्वच्छ शहर' (' मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर ') या मोहिमेचा शुभारंभ शनिवारी सकाळी कोपरी येथील 'प्रकल्प पुनर्निर्माण' येथे करण्यात आला. ठाणेकर नागरिकांनी त्यांच्याकडील आता वापरात नसलेल्या पण टीकाऊ आणि पुन्हा वापरता येतील अशा वस्तू या मोहिमेत जमा कराव्यात. या वस्तू गरजूंना देऊन त्याचा पुनर्वापर केला जाणार आहे. हा उपक्रम ५ जून म्हणजेच पर्यावरण दिनापर्यंत सुरू राहणार आहे.



'माझे जीवन, माझे स्वच्छ शहर' ('मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर') या मोहिमेसाठी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे शहरात ३३ केंद्रे सुरू केली आहेत. शनिवारी, त्यापैकी कोपरी, ठाणे स्टेशन परिसर आणि विवियाना मॉल येथील केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. या समारंभास, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, उपायुक्त तुषार पवार, आरोग्य अधिकारी बालाजी हळदेकर, समर्थ भारत व्यासपीठाचे संचालक उल्हास कार्ले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी भटू सावंत उपस्थित होते. तसेच, खेलो इंडिया स्पर्धा गाजवणारे 'हिंदमिक जिमनॅस्टिक'च्या प्रशिक्षक मानसी सुर्वे, खेळाडू संयुक्ता काळे आणि किमया कार्ले हे या मोहिमेचे सदिच्छा दूत म्हणून उपस्थित होते.

'शून्य कचरा संकल्पना' याच्याकडे आपली वाटचाल सुरू आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर दिसावे, त्यातून नागरिकांचे आरोग्य उत्तम व्हावे हा उद्देश आहे. त्याला ' माझे जीवन, माझे स्वच्छ शहर' (' मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर ') सारखी मोहीम बळ देईल. ठाणे महानगरपालिका आणि समर्थ भारत व्यासपीठ यांनी प्रकल्प पुनर्निर्माण यातून ही गोष्ट आधीच सिद्ध केली आहे, असे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांनी केले. तर, ठाणेकरांना, अल्प वापर झालेल्या, आता वापरात नसलेल्या, डागडुजी करून पुन्हा वापरता येतील अशा वस्तू या केंद्रांवर देता येतील. त्याचा अनेकांना फायदा होईल, असे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तुषार पवार यांनी सांगितले.

केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय यांच्या मार्फत सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेची केंद्रे शहरभर सर्वत्र उघडण्यात येत आहेत. मात्र, गेल्या चार वर्षांपासून ठाणे महानगरपालिका आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कोपरी येथील एसटीपी प्लांटच्या आवारात प्रकल्प पुनर्निर्माण हे पुनर्वापर केंद्र चालवण्यात येते. आतापर्यंत सुमारे दोन लाख नागरिकांचा या प्रकल्पाशी संपर्क आला आहे. १० टन वस्तू गोळा झाल्या असून ७० हजार जुनी पुस्तके पुन्हा वाटण्यात आली आहेत.

'माझे जीवन, माझे स्वच्छ शहर' (' मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर ') या मोहिमेसाठी ठाण्यातील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.

गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये, आधी वेळ ठरवल्यास गाडी पाठवून या वस्तू गोळा करता येतील. या मोहिमेत सहभागी होणाऱ्या सोसायटीला पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रोप भेट देण्यात येणार आहे. सोसायटींच्या सहभागासाठी पुढील व्यक्तींशी संपर्क साधावा. मुकेश नेसवणकर (९८१९०३२४७६), भटू सावंत (९८७०३०९१६).

## 'योद्धा कर्मयोगी एकनाथ शिंदे' या चरित्रग्रंथाचे ३० मे रोजी प्रकाशन

**ठाणे:** महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आजवरच्या जीवन वाटचालीचा वेध घेणारे 'योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे' हे चरित्रपर पुस्तक लेखक प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी लिहिले असून, हा चरित्रग्रंथ 'ग्रंथाली' प्रकाशनाद्वारे प्रकाशित होत आहे. या चरित्रग्रंथाचा प्रकाशन समारंभ शारदा एज्युकेशन सोसायटी, ग्रंथाली आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १८ एप्रिल २०२३ रोजी नियोजित करण्यात आला होता. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव हा कार्यक्रम त्या दिवशी होऊ शकला नाही. मात्र, आता हा प्रकाशन समारंभ मंगळवार, ३० मे २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता ठाण्यातील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे पुर्न आयोजित केला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच गायक अनुप जलोटा, सुरेश वाडकर, सोनू निगम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, आमदार, खासदार व अन्य लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे. या प्रकाशन सोहळ्याचे निमंत्रक राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि शिवसेना प्रवक्ते तथा ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के हे आहेत.

## ५५ वर्षांहून अधिक वयाच्या वाहतूक पोलिसांना रस्त्यावर कर्तव्य बजावण्यासाठी तैनात करू नये

**मुंबई :** दुपारच्या उन्हात कर्तव्य बजावणाऱ्या वाहतूक पोलिसांना सावलीसाठी तात्पुरत्या शेड्स तसेच पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. ५५ वर्षांहून अधिक वयाच्या वाहतूक पोलिसांना रस्त्यावर कर्तव्य बजावण्यासाठी तैनात करू नये, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांना दिले. आवश्यकता भासल्यास मुख्यमंत्री सहायता निधीमधून त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नुकतेच मुख्यमंत्री शिंदे ठाणे येथून मुंबईकडे मार्गक्रमण करत असताना भर उन्हात जागोजागी कर्तव्य बजावत असलेले वाहतूक पोलीस त्यांना दिसले. यातील अनेक पोलीस हे वयाने ज्येष्ठ असूनही भर उन्हात कर्तव्य बजावत असल्याचे त्यांनी पाहिले. शिंदे यांनी त्यांची अवस्था पाहून तातडीने मुंबई पोलीस आयुक्तांना फोन केला आणि यापुढे ५५ वर्षांवरील वाहतूक पोलिसांना भर उन्हात रस्त्यावर कर्तव्य बजावण्यासाठी तैनात करू नये, असे निर्देश दिले. तसेच या वाहतूक पोलिसांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी त्यांना छत्री, जागोजागी यासाठी तात्पुरत्या शेड्स आणि पिण्याचे पाणी पुरवण्याची सूचना केली.

यापुढे ५५ वर्षांवरील वाहतूक पोलिसांना तसेच कोणताही गंभीर आजार असलेल्या वाहतूक पोलिसांना उन्हाच्या जागी कर्तव्य बजावण्यासाठी तैनात करू नये या सुचनेमुळे वाहतूक पोलिसांचे आयुष्य सुसह्य व्हावे यासाठी घेतलेले हे सकारात्मक पाऊल दिलासादायक ठरणार आहे.

